जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७१८ दिनांक - २३/०९/२०२३**

मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## गर्दीचा फायदा घेवुन महागडे मोबाईल चोरणारा चोरटा जेरबंद, साडेतीन लाखाचे एकुण ३१ मोबाईल आरोपी कडुन केले जप्त.

मुंढवा पोलीस ठाणेचे तपास पथक अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक १३/०९/२०२३ रोजी आरोपी कडुन एकुण १४ दुचाकी वाहने व घर फोडीतील मुददेमाल असा एकुण ०७ लाख रु चा मुददेमाल जप्त करुन एकुण १२ गुन्हे उघडकीस आणले होते.

गणेशाचे आगमन अति-उत्साहात चालु असतानाच मुंढवा पोलीस ठाणे तपास पथकामधील स्टाफ हा मुंढवा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ३१६/२०२३ भादंवि कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरी झालेल्या १७०००/- रु कि.चा मोबाईल चोरणा-या अज्ञात चोरटयाचा वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु ताम्हाणे यांचे आदेशाने शोध घेत असताना मुंढवा तपास पथकाला बातमीदार मार्फत बातमी मिळाली की एक इसम चोरुन आणलेले मोबाईल विक्रीसाठी मुंढवा पोलीस ठाणे हददीत येत आहे. लागलीच सदर बातमीवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्याप्रमाणे तपास पथक अधिकारी व स्टाफ असे मिळालेल्या बातमीवरुन बातमी ठिकाणी जावुन एका इसमास ताब्यात घेवुन त्याचे कडुन मुंढवा पोलीस ठाणे दाखल **गुन्हा रजि. नंबर ३१६/२०२३ भादंवि कलम ३७९** मधिल चोरीस गेलेल्या १७०००/- रु कि.च्या मोबाईलसह आणखी **३० ॲन्ड्रॉइड मोबाईल** असे **एकुण ३,५०,०००/- रु. कि.चे** वेगवेगळया कंपनीचे मोबाईल हे आरोपीकडुन जप्त करण्यात आले आहेत.अटक आरोपीचे नाव **सतिश देवा हिरेकेरुर, वय ३६ वर्षे, रा. टाटा सोसायटी, सर्वेनं. ७५ विकासनगर घोरपडी गाव** असे असुन सध्या तो पोलीस कस्टडीत आहे.अटक आरोपीने मुंढवा,भारती विदयापीठ, सहकारनगर, मार्केट यार्ड परीसरात गणेशोत्सवात गर्दीचा फायदा घेवुन मोबाईल चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**खालील गुन्हे आरोपीकडुन उघड करण्यात यश आले आहे.**

१)मुंढवा पोलीस ठाणेगुन्हा रजि. नंबर ३१६/२०२३ भादंविकलम ३७९.
२)मार्केट यार्ड पोलीस ठाणेगुन्हा रजि. नंबर२२६ /२०२३ भादंविकलम३७९.
३) सहकारनगर पोलीस ठाणेगुन्हा रजि. नंबर२४३/२०२३ भादंविकलम ३७९.

आरोपी कडुन जप्त करण्यात आलेल्या मोबाईलच्या आयएमइआय वरुन मोबाईल मालकाचा शोध घेण्याचे काम चालु आहे.तसेच नागरीकांना गणेशोत्सवा दरम्यान स्वताच्या मौल्यवान वस्तुंची काळजी घेण्याचे पोलीस प्रशासनामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

सदरचा गुन्हे उघडकीस आणणेकामी पोलीस अंमलदार दिनेश भांदुर्गे व महेश पाठक यांनी विशेष कामगिरी बजावलेली आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५ श्री विक्रांत देशमुख,मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग श्रीमती अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे श्री विष्णु ताम्हाणे,पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री प्रदिप काकडे, तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक संदिप जोरे, पोलिस उप निरी धनंजय गाडे,दिनेश राणे,दिनेश भांदुर्गे, महेश पाठक, वैभव मोरे, राहुल मोरे सचिन पाटील, स्वप्नील रासकर, हेमंत झुरंगे, प्रविण होळकर, अमोल चव्हाण, रविंद्र देवढे,सीताराम देशमुख यांनी केली आहे.

